राज्यात स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठांच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास शुल्क आकारणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वंअवि २०१५/(१००/१५)/विशि-४

मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई :- ४०००३२.

तारीख: २५ जानेवारी, २०१६.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांकः युएसजी २००६/(२५४/०६)विशि-४/भाग-२, दिनांक २९ मे, २०१३

प्रस्तावना :

राज्यात स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी शासनाने दिनांक २९ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद ५(१) मध्ये स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठी प्रायोजक मंडळाने रु.५ लक्ष संस्करण शुल्क शासनाकडे जमा करुन सविस्तर प्रकल्प अहवालासह अर्ज करण्याची तरतूद आहे.

शासनास अर्ज प्राप्त झाल्यानंतर, शासनाने गठीत केलेल्या छाननी समितीकडून प्रस्तावाची तपासणी करुन समितीने अहवाल शासनास सादर केल्यानंतर, विद्यापीठ स्थापन करणे उचित असल्याबाबत राज्य शासनाची खात्री पटल्यानंतर, शासना मार्फत प्रायोजक मंडळास इरादापत्र निर्गमित करण्यात येते. इरादापत्रामध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याबाबतचा अनुपालन अहवाल इरादापत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीत शासनास सादर करण्याची तरतूद मार्गदर्शक सुचनांमध्ये आहे.

इरादापत्रातील अटींची पूर्तता प्रायोजक मंडळाकडून विहित कालावधीमध्ये न करता, अटींची पूर्तता करण्यासाठी आणखी एक वर्षाचा कालावधी वाढवून दयावा, अशी मागणी शासनाकडे प्रायोजक मंडळाकडून केली जात आहे त्यामुळे अशा मुदतवाढीच्या प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी प्रायोजक मंडळांना पूर्व लक्षी प्रभावाने रु.२.५० लक्ष इतके शुल्क आकारावे असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

राज्यात स्वयंअथसहाय्यीत विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी शासनाने इरादापत्र निर्गमित केल्यानंतर इरादापत्रामध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यासाठी ज्या प्रायोजक मंडळानी शासनाकडे मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव सादर केले आहेत. अशा प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी शासन याव्दारे रु.२.५० लक्ष इतके शुल्क पूर्वलक्षी प्रभावाने विहित करीत आहे. त्यानुसार ज्या प्रायोजक मंडळांना इरादापत्रातील अटींची पूर्तता करण्यासाठी मुदतवाढ हवी आहे त्यांनी रु.२.५० लक्ष इतक्या रकमेचा धनादेश अथवा धनाकर्षासह मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच ज्यांनी

यापूर्वी मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे व त्यांना शासनाने मुदतवाढ दिली आहे. त्या प्रायोजक मंडळानी देखील रु.२.५० लक्ष इतक्या रकमेचा धनादेश/धनाकर्ष शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२५११५३४३०००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash R Kadam

Digitally signed by Prakash R Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash R Kadam
Date: 2016.01.28 11:01:51 +05'30'

प्रकाश रा. कदम
शासनाचे अवर सचिव

प्रति :-

१) मा. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (उवतंशि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (उवतंशि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. महा अधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय,मुंबई.
६) मा. उच्च न्यायालयाचे सरकारी अधिवक्ता, मुंबई/औरंगाबाद/नागपूर.
७) सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलगुरु.
८) संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) संचालक (व्यवसाय शिक्षण) संचालनालय,मुंबई.
१०) संचालक (प्रशिक्षण) संचालनालय,मुंबई.
११) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई.
१२) संचालक कला संचालनालय,मुंबई.
१३) संचालक ग्रंथालय संचालनालय,मुंबई.
१४) सर्व सह संचालक, उच्च शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/तंत्र शिक्षण, मंत्रालयीन सर्व विभाग.
१५) संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.
१६) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव.
१७) मा.प्रधान सचिव (उवतंशि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती(विशि-४).